**शेतक-यांना टिश्यू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करण्यासाठी "अटल बांबू समृध्दी योजना" राबविण्यास मान्यता प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. साववि-२०१८/प्र. क्र. १८४/फ-११**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: २८ जून २०१९

**प्रस्तावना:-**

बांबू हे एक बहुपयोगी वनोपज असून आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचे असल्यामुळे त्यास **"हिरवे सोने" (Green Gold)** असे संबोधले जाते. मानवाच्या लाकूड विषयक गरजा पूर्ण करण्याकरिता सहज उपलब्ध होणारे व परवडणारे वनोपज असल्याने बांबूला **" गरीबांचे लाकूड "** (Timber of the Poor) असेही म्हटले जाते. बांबू ही जलद वाढणारी, सदाहरीत व दिर्घायु प्रजाती आहे. बांबू लागवडीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा (Economic Security) मिळण्याची क्षमता आहे.

देशात बांबूची बाजारपेठ सुमारे रु.२६,००० कोटीची असून त्यामध्ये बांबू फर्निचर, बांबू पल्प, बांबू मॅट बोर्ड, कार्टेज इंडस्ट्रीज, प्लाय बोर्ड इत्यादी समाविष्ठ आहे. बांबूमध्ये जास्त गतीने कार्बन शोषण करुन ग्लोबल वार्मिंगलाही मात देण्याची अमर्यादित क्षमता आहे. या सर्व बाबींचा विचार करुन बांबूचा समुचित विकास करणे तसेच बांबूच्या क्षमतेचा पुरेपूर उपयोग गरीब जनतेच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरिता करणे व त्यायोगे संपूर्ण देशाचा विकास साधण्याकरिता केंद्र शासनाने राष्ट्रीय बांबू मिशन (National Bamboo Mission ) ची स्थापना केलेली आहे.

बांबू लागवडीमुळे शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन त्यांचे जीवनमान उंचविण्यास मदत होणार आहे. त्याकरीता शेतक-यांना उत्तम बांबू रोपांचा पुरवठा होणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्राबाहेरील राज्यांमधून बांबूची टिश्यू कल्चर रोपे उपलब्ध होतात. उत्तम गुणधर्म असलेल्या टिश्यू कल्चर बांबू रोपांची निर्मिती राज्यामध्येच करून ती शेतक-यांना शेतजमिनीवर तसेच शेताच्या बांधावर लागवडीकरिता सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्याच्या योजनेस दिनांक २७ जून २०१९ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने, शेतक-यांना सवलतीच्या दराने टिश्यू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करण्यासाठी नवीन योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

**१.०** शेतजमिनीवर तसेच शेताच्या बांधावर बांबू लागवडीकरिता शेतक-यांना सवलतीच्या दराने टिश्यू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करण्यासाठी **"अटल बांबू समृध्दी योजना"** या नावाने नवीन योजना राबविण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**२.० उद्दिष्ट :-**

२.१ शेतक-यांना टिश्यू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करणे.

२.२ शेतीतून मिळणा-या उत्पन्नाला जोड देण्यासाठी शेत जमिनीवरील बांबू लागवडीखालील क्षेत्र वाढविणे.

२.३ बांबू लागवडीमुळे शेतक-यांस उपजिवीकेचे साधन निर्माण करणे व शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत करणे.

## ३.० <u>टिश्यू कल्चर बांबू रोपांची आवश्यकता :-</u>

३.१ बांबूच्या वैशिष्टयानूसार बांबूस ज्यावेळी फुलोरा येतो, त्यावेळी बांबू मृत होतो. बांबूस फुलोरा हा खालील दोन प्रवृत्तीमध्ये येतो.

अ) <u>Sporadic flowering</u> :- यामध्ये बांबू क्षेत्रातील सलग सर्व बांबूस फुलोरा न येता काही निवडक बांबूस तुरळक ठिकाणी फुलोरा येतो.

**ब)** Gregarious flowering: - यामध्ये बांबू क्षेत्रातील सलग सर्व बांबूस फुलोरा येतो.

बांबूचे जीवनचक्र हे ४० ते १०० वर्ष असल्यामुळे त्यांचे बियाणे वेळेवर उपलब्ध होत नाही. तसेच Gregarious flowering येण्याचे ठिकाण आणि कालावधी याची निश्चिती नसते. त्यामुळे या बीयांपासून होणारी प्रजाती ही व्यवसायिकरित्या तयार करणे शक्य होत नाही.

३.२ बांबू बीयांची उगवणी ( Germination ) फार कमी असून त्याची उगवण क्षमता (Viability ) फक्त ३ ते ६ महिने असते. या अनिश्चिततेमुळे बांबूला कलम तयार करुन (Vegetative Propogation) बांबू रोपे तयार केली जातात. **उत्तम बांबू रोपे आणि प्रजातीच्या शुद्धतेची गुणवत्ता टिकवून ठेवणे व मोठया प्रमाणात बांबू रोपांच्या निर्मितीसाठी टिश्यू कल्चर बांबू रोपे तयार करणे हा एक उत्तम पर्याय आहे.**

३.३ शेतक-यांनी बाजारातील उपलब्ध इतर रोपवाटिकांमधून बांबू रोपे खरेदी करुन शेतात लावल्यानंतर त्यांना प्रजातीची ओळख नसेल तर त्या प्रजातीपासून ५ वर्षाच्या मेहनती/श्रमानंतर अपेक्षेप्रमाणे उत्पन्न मिळणार नाही. त्यामुळे शेतक-यांचे खूप नुकसान होईल. त्यासाठी **शुद्धता** व ओळखीची प्रजाती उपलब्ध करुन देणे हे बांबू विकासाचा मुख्य उद्देश आहे. शेतक-यांना टिश्यू कल्चर बांबू रोपे उपलब्ध करुन दिल्यास हा उद्देश पूर्ण होऊ शकतो.

## ४.० <u>टिश्यू कल्चर बांबू रोपांकरिता प्रजाती :-</u>

४.१ महाराष्ट्रामध्ये मानवेल (Dendrocalamus strictus), कटांग (Bambusa bambusa) या प्रजाती विदर्भ क्षेत्रात तर माणगा (Oxytenenthara stocksii) ही प्रजाती कोकण क्षेत्रात मोठया प्रमाणात आढळून येते.

बांबू क्षेत्रात ब-याच वर्षापासून काम करणा-या तज्ञांसोबत चर्चा करुन वरील ३ स्थानिक प्रजाती व्यतिरिक्त खालील ५ प्रजाती निवडण्यात आलेल्या आहेत :-

१) Bambusa balcooa

२) Dendrocalamus brandisii

३) Bambusa nutan
४) Dendrocalamus asper
५) Bambusa tulda

४.२ राष्ट्रीय बांबू अभियानाच्या व्यापारिक दृष्टिकोनानुसार शेतक-यांच्या शेतामध्ये लागवड योग्य ५ प्रजातीपैकी पहिले ४ मोठे बांबू असून त्यांच्यापासून बायोमास चांगल्या पद्धतीने उपलब्ध होणार आहे. Bambusa tulda ही प्रजाती ( यातील दोन गटाचे अंतर जास्त असून) अगरबत्ती व इतर हस्तकला कामासाठी उपयुक्त प्रजाती आहे.

## ५.० टिश्यू कल्चर प्रयोगशाळा :-

महाराष्ट्रामध्ये आजमितीस केळी, डाळींब, फलोद्यान, शोभीवंत झाडे इत्यादी व इतर वृक्षांचे टिश्यू कल्चर रोपे तयार करुन देण्यासाठी विविध प्रयोगशाळा उपलब्ध आहेत. महाराष्ट्र बांबू विकास मंडळांने शासनाच्या महाबीज आणि इतर टिश्यू कल्चर प्रयोगशाळा यांचेशी संपर्क साधून टिश्यू कल्चर रोपे मोठया प्रमाणात उपलब्ध करुन देण्याकरिता या संस्थेतील प्रत्येकी एका तंत्रज्ञास केंद्र शासनाच्या काष्ठ विज्ञान आणि प्रौद्योगिकी संस्था (Institute of Wood Science and Technology), बंगळुरु येथे एक आठवडयाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

महाराष्ट्र बांबू विकास मंडळ आणि काष्ठ विज्ञान व प्रौद्योगिकी संस्था (IWST) यांचेमध्ये तंत्रज्ञान उपलब्ध करुन प्रशिक्षण देण्याकरिता करारनामा झालेला आहे. काष्ठ विज्ञान एवं प्रौद्योगिकी संस्था (IWST) ही संस्था ७ प्रजातींचा प्रोटोकॉल्स व त्यांच्या बेस कल्चर उपलब्ध करुन देणार आहेत. या प्रशिक्षणामार्फत बांबू टिश्यू कल्चर रोपे महाराष्ट्रामध्ये पसरलेल्या विविध प्रयोगशाळांमध्ये तयार करुन शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्राबाहेरील राज्यांमधून बांबूची टिश्यू कल्चर रोपे उपलब्ध होतात. जर महाराष्ट्रातील या प्रयोगशाळांमध्ये रोपांची निर्मिती व हार्डनिंग झाले तर शेतक-यांच्या शेतजमिनीवरील बांबू लागवड यशस्वी होण्याची शक्यता उंचावणार आहे. तसेच महाराष्ट्रातील स्थानिक टिश्यू कल्चर प्रयोगशाळांना सुध्दा प्रोत्साहन मिळेल व शेतक-यांना जवळच्या प्रयोगशाळांमधूनच बांबू रोपांचा पुरवठा करण्यात येईल. महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडून हा कार्यक्रम पुढे चालू ठेवण्यात येणार आहे.

## ६.० बांबू लागवडीचे फायदे / वैशिष्ट्ये .

६.१ बांबू प्रजातीचे जीवनचक्र ४०-१०० वर्ष असल्याने दरवर्षी बांबू लागवड करण्याची आवश्यकता नाही. (अन्न धान्य तसेच भाजीपाल्याप्रमाणे दरवर्षी बांबू लागवड करण्याची गरज नाही. बांबूचे जीवनचक्र म्हणजेच बांबूला फुलोरा येईपर्यत बांबू जिवंत असतो.)

६.२ बांबूला कमी किंवा जास्त पाऊस झाला तरी शेतीसारखे नुकसान होत नाही. बांबूच्या बेटांमध्ये दरवर्षी ८-१० नवीन बांबू तयार होत असतात. पाणी साचलेल्या (पाणथळ) जमिनीवर, क्षारयुक्त जमिन तसेच मुरमाड जमिनीवर सुध्दा बांबूची लागवड यशस्वीरित्या होवू शकते. इतर पिकांच्या तुलनेत बांबूच्या शेतीवर ३०-४० टक्के कमी खर्च येतो.

६.३ पहिल्या व दुस-या वर्षीचे बांबू सोडून, तिस-या वर्षानंतर बांबू काढता येत असल्यामुळे शाश्वत उत्पन्न मिळू शकते.

६.४ बांबू लागवडीमुळे शेत जमीनीची धूप व जलसंवर्धन या दोन्ही बाबींचा सुध्दा फायदा मिळेल.

उक्त नमूद वैशिष्ट्यांमुळे शेतक-यांना शाश्वत आधार व आर्थिक सुरक्षितता (Economic Security) मिळेल. याशिवाय बांबूच्या कोंबापासून तर पानांपर्यत २६ मूल्यवर्धित उत्पादने तयार करण्याची क्षमता बांबूमध्ये आहे. **उदा.** बांबू कोंबापासून लोणचे, भाजी, लाकूड, पडदे, फर्निचर, अगरबत्ती, कापड, उर्जा (CNG, Ethanol, Charcoal) इ. यामुळे बांबूचा कच्चा माल उपलब्ध होण्याकरिता शेतकऱ्यांना शेतामध्ये मोठया प्रमाणावर बांबू लागवड करण्यास प्रोत्साहित करणे हे शेतकऱ्यांच्या हिताचे व पर्यावरण पूरक आहे.

## ७.० <u>बांबूपासून उत्पन्न होणाऱ्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांना बाजारपेठ :-</u>

बांबूपासून उत्पन्न होणाऱ्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील.

## ८.० <u>टिश्यू कल्चर बांबू रोपांचा दर :-</u>

टिश्यू कल्चर बांबू रोपांचा दर अंदाजे रु. २५/- प्रती रोप आहे. शेतकरी बांबू रोपे अगोदर खरेदी करुन त्याचे शेत जमिनीवर लागवड करतील. शेतजमिनीवर केलेल्या बांबू लागवडीचे तपासणीनंतर बांबू रोपांचे किंमतीपैकी शासनाकडून ४ हेक्टर किंवा त्याखालील शेती असलेल्या भूधारकांना ८० टक्के तर ४ हेक्टरपेक्षा अधिक शेती असलेल्या भूधारकांना ५० टक्के सवलतीच्या दराने (सबसिडी) त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येईल. तसेच उर्वरित बांबू रोपांची किंमत अनुक्रमे २० व ५० टक्के प्रमाणे खर्च हा शेतकऱ्यांनी स्वत: करावयाचा आहे.

## ९.० <u>लाभार्थ्यांची निवड :-</u>

लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात येत आहे:-

९.१ शेतकऱ्यांनी सवलतीच्या दराने बांबू रोपे मिळण्यासाठी महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने विहीत केलेल्या नमुन्यात खालील दस्तावेजासह अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

(१) शेतीचा गाव नमूना ७/१२, गाव नमूना आठ, गाव नकाशाची प्रत.

(२) ग्राम पंचायत / नगरपरिषद / नगरपंचायत यांचेकडून रहिवासी असल्याबाबतचा दाखला.

(३) बांबू लागवड करावयाच्या शेतामध्ये बांबूचे अपेक्षित उत्पन्न मिळण्यासाठी ठिबक सिंचन व बांबू रोपे लहान असतांना डूकरापासून रोपे सुरक्षित ठेवण्यासाठी संरक्षक कुंपणाची सोय असल्याबाबतचे हमीपत्र.

(४) आधार कार्डची प्रत.

(५) बँक खात्याचा तपशील व पासबुकची प्रत/कोऱ्या धनादेशाची छायांकित प्रत.

(६) अर्जदार शेतकऱ्याने त्याचे बँकेचे खाते आधार क्रमांकाशी जोडून घेणे आवश्यक राहील आणि त्याकरीता त्याने बँकेला दिलेल्या पत्राची व बँकेकडून मिळालेल्या पोहोच पावतीची प्रत.

(७) शेतामध्ये विहीर/शेततळे/बोअरवेल असल्याबाबतचे विहीत प्रपत्रात हमीपत्र.

(८) बांबू रोपांची निगा राखणे व संरक्षण करण्यासंदर्भात विहीत प्रपत्रात हमीपत्र/बंधपत्र.

(९) जिओ टॅग / जीआयएसद्वारे फोटो पाठविण्याबाबत हमीपत्र.

(१०) ज्या शेतजमिनीवर तसेच शेताच्या बांधावर बांबू लागवड करावयाची आहे ते क्षेत्र **नकाशावर** हिरव्या रंगाने दर्शविणे.

९.२ महाराष्ट्र बांबू विकास मंडळामार्फत बांबू लागवड करण्याकरिता वृत्तपत्रात व्यापक प्रसिध्दी देऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येणार आहे. जे शेतकरी ऑनलाईन अर्ज सादर करु शकणार नाहीत, ते त्यांचे क्षेत्रातील संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक ) यांचे कार्यालयात लेखी अर्ज सादर करु शकतील. शेतकऱ्यांची निवड करताना लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास " सोडत " पध्दतीने अर्जदारांची निवड करण्यात येईल.अटी पूर्ण न झाल्यास, अर्ज नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांना राहील.

९.३ ज्या अर्जदाराची वरीलप्रमाणे निवड होईल त्यास महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडून निवडीबाबतचे पत्र देण्यात येईल. त्यानंतर अर्जदाराने महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने प्रमाणित केलेल्या रोपवाटिकेतून रोपांची खरेदी करुन लागवड करणे आवश्यक आहे. तदनंतर अर्जदाराने महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडे अनुदानाची मागणी करावी. महाराष्ट्र बांबू विकास मंडळ/ वन विभागाकडून लागवडीच्या पाहणीनंतर विहित पध्दतीने अर्जदारास अनुदानाचे वाटप करण्यात येईल. वरील पध्दतीने निवड झालेल्या अर्जदाराव्यतिरिक्त अन्य अर्जदाराने बांबूची लागवड केली असल्यास त्यास अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

**१०.० <u>अंमलबजावणीची पध्दत :-</u>**

१०.१. बांबू लागवडीचे काम हे महाराष्ट्र बांबू विकास मंडळ व वन विभागाच्या सहभागाने पूर्ण करण्यात येईल. प्रथम शेतक-यांनी महाराष्ट्र बांबू विकास मंडळ व वन विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने प्रमाणित केलेल्या रोपवाटिकेतून बांबू रोपे खरेदी करुन त्याची लागवड करावी.

१०.२. टिश्यू कल्चर रोपे लागवड ही प्रती हेक्टरी ५०० रोपे (५ मी. X ४ मी. अंतरावर ) याप्रमाणे ५०० बांबू रोपे अधिक २० % मरअळी याप्रमाणे १०० रोपे असे एकूण ६०० रोपे प्रती हेक्टरी करावयाची आहे. ४ हेक्टर पेक्षा कमी शेती असणा-या शेतकऱ्यांना १ हेक्टरकरिता एकूण ५०० + २० % मरअळी याप्रमाणे १०० असे एकूण ६०० बांबू रोपे ८० % सवलतीच्या दराने तसेच ४ हेक्टर पेक्षा अधिक शेती असणा-या शेतकऱ्यांना १ हेक्टरकरिता एकूण ५०० +२० % मरअळी याप्रमाणे १०० असे एकूण ६०० बांबू रोपे ५० % सवलतीच्या दराने अनुज्ञेय राहील. सदर लागवडीची महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडून पाहणी करुन ती प्रमाणित केल्यानंतर शासनाकडून प्राप्त अर्थसहाय्य, त्यांचे बँक खाते / पोस्टाचे बचत खात्यामध्ये थेट ( DBT) जमा करण्यात येईल. उर्वरित बांबू रोपांची किंमत अनुक्रमे २० % व ५०% ही शेतक-यांनी स्वत: खर्च करावयाची आहे. ( उदा. टिश्यू कल्चर बांबू रोपाची किंमत रु. २५/- असल्यास, ४

हेक्टर पेक्षा कमी शेती असणा-या शेतकऱ्यांना रु. २०/- प्रति रोप (८०% ) तर ४ हेक्टर पेक्षा अधिक शेती असणा-या शेतकऱ्यांना प्रति रोप रु.१२.५०/- (५०%) इतके अनुदान शासनाकडून देय राहील. याव्यतिरिक्त उर्वरित रक्कम अनुक्रमे रु. ५/- व रु. १२.५०/- प्रति रोप याप्रमाणे शेतकऱ्यास स्वत: अदा करावी लागेल)

१०.३ सन २०१९-२० पासून सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल.

१०.४ शेतजमिनीतील मातीचा पोत, सिंचनाची सोय, जवळची बाजारपेठ, स्थानिक पातळीवरील बांबूची असलेली मागणी इत्यादी बाबी विचारात घेऊन बांबू प्रजातींच्या लागवडीबाबत तज्ञांकडून मार्गदर्शन केले जाईल. शेतीमध्ये बांबू लागवडीनंतर त्याची निगा राखणे, संरक्षण, पाण्याची मात्रा, खते, किटकनाशकाची फवारणी, आंतरपीक इत्यादीबाबत महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडून नियुक्त केलेले सल्लागार, तज्ञ, व वन विभागाचे स्थानिक क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांचेकडून तांत्रिक मार्गदर्शन केले जाईल. तसेच वन विभागाच्या “१९२६-हॅलो फारेस्ट” या कॉल सेंटरवर देखील यानुषंगाने मार्गदर्शन आणि मदत मिळेल.

## ११.० <u>थेट लाभ हस्तांतरण पध्दतीव्दारे (DBT) लाभार्थ्याच्या बँक खात्यात रोख रकमेचे हस्तांतरण:-</u>

११.१ लाभार्थी शेतक-यांनी बांबू रोपांची खरेदी महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने प्रमाणित केलेल्या रोपवाटिकेतून कॅशलेस पध्दतीने करावी. त्याकरिता, त्याने त्याच्या आधारक्रमांकाशी निगडीत स्वत:च्या बँक खात्यातून, विक्रेत्याला किंमतीचे प्रदान करावे. म्हणजेच NEFT,RTGS,IMPS इत्यादी Electronic Fund Transfer किंवा धनाकर्ष (डिमांड ड्राफट)/धनोदशाव्दारे (चेक) किंमतीचे प्रदान होणे आवश्यक आहे व त्याचा पुरावा अनुदानाच्या मागणीचा दावा करताना सोबत देणे आवश्यक आहे.

११.२ लाभार्थी शेतक-यांनी वरीलप्रमाणे बांबू रोपांची खरेदी केल्यानंतर देयकाची प्रत संबधीत रोपवाटिकेकडून दोन प्रतीत घ्यावी व त्यापैकी एका देयकाची स्वयंसाक्षांकित प्रत महाराष्ट्र बांबू विकास मंडळ अथवा वन विभागाच्या संबधित अधिका-याकडे/कार्यालयाकडे सादर करावी.

११.३ वरीलप्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर अनुदानाची संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट लाभ हस्तांतरण पध्दतीव्दारे (DBT) जमा करण्यात यावी.

## १२.० <u>संनियंत्रण व मूल्यमापन :-</u>

शेतीमध्ये लागवड केलेल्या जिवंत बांबू रोपांची संख्या, रोपांची वाढ व पूर्ण वाढ झालेल्या बांबूची कापणी पूर्व व कापणीनंतर संनियंत्रण व व्यवस्थापन तसेच पुढील कालावधीत बांबूचे विक्रीसाठी उपलब्ध बाजारपेठ, शेतक-यांचे आर्थिक व सामाजिक स्तरावर होत असलेली प्रगती, योजनेची यशस्वीतता इत्यादींचे मूल्यमापन महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडून नियुक्त केलेले सल्लागार, तज्ञ व वन विभागाचे स्थानिक क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांचेकडून करण्यात यावे.

शेत जमिनीवर बांबूची लागवड केल्यानंतर त्याचे **जिओ टॅग (Geo Tag)** करण्यात यावे आणि **GIS** मध्ये शेताचे पॉलीगॉन तयार करुन वारंवार त्या बांबू लागवडीच्या प्रगतीबाबत गुगल अर्थच्या (Google Earth-Kml file) माध्यमातून पर्यवेक्षण सुध्दा करण्यात यावे.

## १३.० टिश्यू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करण्यासाठी पुरवठादारांच्या निवडीकरिता समिती :-

### १३.१ समितीची संरचना :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक ( वन बल प्रमुख ) महाराष्ट्र राज्य , नागपूर - अध्यक्ष
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक ( उत्पादन व व्यवस्थापन ) महाराष्ट्र राज्य , नागपूर -सदस्य
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक ( अर्थसंकल्प,नियोजन व विकास ), नागपूर - सदस्य
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर - सदस्य सचिव

### १३.२ समितीची कार्यकक्षा :-

"अटल बांबू समृध्दी योजना " अंतर्गत शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शेतजमिनीवर तसेच शेताच्या बांधावर बांबू लागवडीकरिता शेतकऱ्यांना टिश्यू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करावयाचा आहे. त्यासाठी ई-निविदाद्वारे तसेच राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन स्पर्धात्मकरित्या दर प्राप्त करुन दर व गुणवत्तेच्या आधारे पुरवठादाराची निवड करणे.

### १३.३ समितीचे अधिकार व कर्तव्ये :-

१. बांबू रोपांचा पुरवठा करण्यासाठी ई- निविदेद्वारे प्राप्त दरांचे मूल्यमापन करुन दर निश्चित करणे.
२. टिश्यू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करण्यासाठी निवड केलेल्या पुरवठादारांची यादी (panel ) निश्चित करणे.

## १४.० टिश्यू कल्चर बांबू रोपांच्या लागवडीकरिता जिल्हानिहाय लक्ष्यांक व संभाव्य खर्च :-

| अ. क्र. | एकूण जिल्हे | शेतकरी संख्या | लागवड करावयाची बांबू रोपे | लागवडीकरिता आवश्यक एकूण रोपे | दर प्रती रोप (अंदाजे) | एकूण अपेक्षित खर्च (रुपये लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३४ | ३७५ प्रती जिल्हा प्रमाणे १२७५० ( ४ **हेक्टर** किंवा त्याखालील शेती असलेले भूधारक) | ६०० रोपे प्रती शेतकरी (कमाल १ **हेक्टर** पर्यंत) (प्रती हेक्टर ६०० रोपे) ( ५X४ मी. अंतरावर ) | ७६.५० लक्ष | रु.२०.०० प्रती रोप (८०% शासनाकडून अदा करावयाचे अर्थसहाय्य) | १५३०.०० |
| २ | ३४ | ३७५ प्रती जिल्हा प्रमाणे १२७५० ( ४ **हेक्टर** पेक्षा अधिक शेती असलेले भूधारक) | ६०० रोपे प्रती शेतकरी (कमाल १ **हेक्टर** पर्यंत) (प्रती हेक्टर ६०० रोपे) (५X४ मी. अंतरावर) | ७६.५० लक्ष | रु.१२.५० प्रती रोप (५०% शासनाकडून अदा करावयाचे अर्थसहाय्य) | ९५६.२५ |
| | | | **एकूण** | **१५३.००लक्ष** | -- | २४८६.२५ |
| | | जाहिरात व प्रसिध्दी, कार्यालयीन खर्च | | | | १३.७५ |
| | | एकूण | | | | रु. २५००.०० |

उपरोक्त लाभधारक गटामध्ये कमी लाभार्थ्यांची निवड झाल्यास / अनुदान शिल्लक असल्यास, दुस-या गटातील लाभार्थ्यांची निवड करण्यास व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**१५.०** सदर योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्याची कार्यवाही वेगळयाने करण्यात येईल, तोपर्यंत सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालील लेखाशिर्षात आर्थिक तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च,
(००)(०६) सामुहीक पातळीवर ठोस रोपवन,
वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम (४४०६ ०४९२)

**१६.०** सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दि. २७ जून २०१९ रोजी झालेल्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार आणि **नियोजन विभागाचा अनौ.सं.क्र. ३९/१४७५ ,दि.०४.०२.२०१९व वित्त विभागाचा अनौ.सं. क्र.ममंप्र-२०१९/ सं.क्र.०७/ व्यय-१०, दि.०७.०३.२०१९ अन्वये** दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

**१७.०** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७०३१२१३३५९७१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA
RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec
375cd62a646a64986631086810, postalCode=400032,
street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI,
ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.07.03 12:26:40 +05'30'

**( वीरेन्द्र तिवारी )**
**अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक, ( मंत्रालय )**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.मंत्री (वित्त,नियोजन व वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, महाराष्ट्र राज्य,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
६. सर्व विधान परिषद/विधान सभा सदस्य, महाराष्ट्र राज्य विधानमंडळ , मुंबई
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (वने),महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख ),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
१२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.

१३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन),महाराष्ट्र राज्य,नागपूर.

१४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ लि., नागपूर

१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर

१७. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)

१८. वनसरंक्षक , सामाजिक वनीकरण (६ वृत्त)

१९. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)

२०. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,

२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.

२३. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई

२४. माहीती व जन संपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२

२५. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२

२६. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२७. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२८. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२९.निवडनस्ती/फ-११.

---